HELLO लोकमत

# दांडियासाठी कॉस्मेटिक सर्जरी करण्याकडे तरुणाईचा कल

श्रीशा वागळे

**मुंबई, दि. ४** - नवरात्र म्हणजे दांडिया आणि दांडिया म्हणजे तरुण-तरुणींसाठी नटण्या-मुरडण्याची एक चांगली संधी असते. सणासुदीच्या काळात आणि त्यातही दांडियामध्ये सर्वांच्यात उठून दिसावे असा प्रत्येकाचाच प्रयत्न असतो. मात्र आता फक्त बाह्य मेकअप आणि ब्युटीपार्लरवर अवलंबून न राहता कॉस्मेटिक सर्जरीद्वारे कायमचे सौंदर्य मिळवण्याचा पर्याय अनेक जण स्वीकारत आहेत.

दांडियाला आता ग्लॅमर प्राप्त झाल्याने तरुणांमध्ये त्याची प्रचंड क्रेझ आहे. अनेक दांडियांमध्ये मोठमोठ्या रकमेची पारितोषिकेही दिली जातात. यात नृत्याबरोबरच सौंदर्याचाही प्राधान्याने विचार केला जातो. त्यामुळे फक्त ब्युटी



पार्लरमध्ये जाऊन काही तास सौंदर्य मिळवण्यापेक्षा थोडे जास्त पैसे खर्च करून चेहऱ्यावरील छोट्या-मोठ्या समस्या कायमच्या दूर करण्याकडे तरुण-तरुणींचा भर आहे.

दांडिया म्हणजे धमाल मस्ती... चांगले कपडे, दागदागिने तर असतातच पण चारचौघांमध्ये उठून दिसावे यासाठी थोडे जास्त प्रयत्न करावेच लागतात. ब्युटीपार्लरही आता महागच होत चालली आहेत. त्या तुलनेत कॉस्मेटिक सर्जरी

**वेध नवरात्रीचे**

आता बऱ्याच प्रमाणात स्वस्त झाली आहे. ब्युटीपार्लरच्या खर्चात काही पैसे टाकले तर सहज छोटी कॉस्मेटिक सर्जरी होऊन जाते आणि ती कायमस्वरूपी असते. यामुळे हा पर्याय आमच्यासारखे तरुण-तरुणी स्वीकारत असल्याचे सीमा या युवतीने सांगितले.

आजच्या जगात चांगले दिसावे असा प्रयत्न प्रत्येक जण करत असतो. सण-उत्सवात तर हे प्रमाण फारच वाढते. त्यातही नवरात्र, दिवाळी आणि लग्नाच्या मौसमात अशा प्रकारे शस्त्रक्रिया करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तरुण-तरुणी आणि मध्यमवयीन लोकही आमच्याकडे येतात. महिलांबरोबरच पुरुषांचीही संख्या मोठी असते, असे प्रसिद्ध कॉस्मेटिक सर्जन डॉ. मोहन थॉमस यांनी सांगितले.

चेहऱ्यावरील सुरकुत्या, नाक सरळ करणे, गालावर खळी पाडून घेणे, हनुवटीवरील शस्त्रक्रिया, डोळ्यांखालील काळी वर्तुळे घालवणे, स्मितरेषा, ओठांचा आकार बदलणे अशा शस्त्रक्रिया करण्यावर लोकांचा भर आहे. कॉस्मेटिक सर्जरी आता (पान २)

पान १ वरून

## सर्जरी करण्याकडे तरुणाईचा कल

फक्त श्रीमंतांची मक्तेदारी राहिली नाही. तर आधुनिक तंत्रज्ञानामुळे ती आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात आली आहे, असे ते म्हणाले.

बोटोक्स या तंत्रज्ञानामुळे आता अत्यंत कमी वेळात शस्त्रक्रिया होत आहेत. लंच टाइममध्ये शस्त्रक्रिया करून पुन्हा कामावरही परतता येते. एकाच बैठकीत सहजपणे या शस्त्रक्रिया होऊ शकतात. बोटोक्ससाठी १० हजार रुपये तर गाल आणि ओठांच्या शस्त्रक्रियेसाठी २० हजार रुपयांचा खर्च येतो. मात्र यामुळे कायमस्वरूपी सौंदर्य मिळू शकते. बोटोक्स पद्धतीत त्वचेला उजाळा मिळत असल्याने सौंदर्य अधिकच खुलून दिसते. त्यामुळे या पद्धतीला लोकांकडून मोठी मागणी आहे. सौंदर्यवृद्धीसाठी कॉस्मेटिक सर्जरी हा आजच्या जगातील सोपा पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले.